# प्रेस नोट

दिनांक :- ११/०२/२०२२

## वाशिम जिल्हयात ३ दिवसात कोटपा कायदयान्वये एकुण २५२ कारवाया.

महाराष्ट्र शासनातर्फे वेळोवेळी आदेश निर्गमित करुन संपूर्ण राज्यभरात सिगारेट व इतर तंबाखुजन्य पदार्थ (व्यापार व वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे निषेध) अधिनियम,२००३ कोटपा कायदा २००३ अन्वये कारवाई करण्यात येते.

शाळा कॉलेज मधील तरुण पिढी व्यसनाचे आधिन जाऊ नये या करीता शिक्षण संस्थांच्या १०० यार्डाच्या आवारात तंबाखुजन्य पदार्थाची विक्रीस प्रतिबंधात्मक नियमांचे पालन न करणाऱ्या पान बिडी दुकाने यांचे वर कारवाई करण्यात येते.

वाशिम जिल्हयात सन २०१९ विशेष मोहिम राबवुन कोपटा कायदयान्वये एकुण २३२ कारवाया करूण ३९१५० रू दंड आकारण्यात आले होते तर सन २०२० मध्ये कोटपा कायदयान्वये एकुण ०४ कारवाया करूण ४०० रू दंड व सन २०२१ मध्ये एकुण ४ कारवाया करूण १२०० रू दंड आकारण्यात आले होते.

मा. पोलीस अधिक्षक वाशिम यांनी जिल्हयाची सुत्रे हाती घेताच अवैध धंदयावर कायदयाचा वचक बसविला तर ३ दिवसाची विशेष मोहिम राबवुन सिगारेट व इतर तंबाखुजन्य पदार्थ (कोटपा कायदया) अन्वये एकुण २५२ कारवाया करूण एकुण ५१६०० रू दंड आकारण्यात आले.

नमुद कार्यवाहीत मा.पोलीस अधिक्षक श्री बच्चनसिंह, अप्पर पोलीस अधिक्षक गोरख भामरे यांचे मार्गदर्शनात वाशिम जिल्हयातील पोलीस ठाणे, स्थानिक गुन्हे शाखेची पथके तयार करुन आरोग्य विभागाच्या पथका सह करण्यात येते.

पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा वाशिम